# सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर शाळेत विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात

**नाशिक ।** नाशिक एज्युकेशन सोसायटी संचलित सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर शाळेत या शैक्षणिक वर्षात विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. ढोल ताशांच्या गजरात विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रतिनिधीक स्वरूपात मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून सरस्वती पूजन करण्यात आले.



नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशोत्सवाप्रसंगी संपूर्ण शालेय परिसर सजवण्यात आला होता. फुलांच्या माळा, प्रवेशोत्सवाचा सेल्फी पॉईंट,फुगे, पताके, शैक्षणिक रांगोळ्या, झेंडे, रंगीतसंगीत फलकलेखन यामुळे शाळा अधिक आकर्षक उठावदार दिसत होती. या कार्यक्रमाप्रसंगी स्वागत व प्रास्ताविकातून मुख्याध्यापक राजेंद्र निकम यांनी शिक्षणाचे महत्त्व विशद करून विद्यार्थ्यांना अभ्यासाबरोबर खेळण्याचे सल्ला दिला. शालेय समिती अध्यक्षा रंजना परदेशी यांनी विद्यार्थ्यांना हसा, खेळा पण शिस्त पाळा हा मंत्र समजावून सांगितला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक तथा संस्था कार्यवाह राजेंद्र निकम, शालेय समिती अध्यक्ष रंजना परदेशी, प्रमुख अतिथी म्हणून शाळेच्या माजी ज्येष्ठ शिक्षिका सुनंदा भोळे, जयश्री दोंदे, उंटवाडी प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका वैशाली फडके, उज्वला कासार, कल्पना उदावंत, शिक्षक प्रतिनिधी अशोक शिरुडे, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा विजयालक्ष्मी देव, सांस्कृतिक समिती प्रमुख प्राजक्ता क्षीरसागर, दुपार सत्र प्रमुख मनीषा जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. प्रवेशोत्सवाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सारिका सूर्यवंशी, भावना नागपूरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अशोक शिरुडे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उषा जोपळे, हर्षल कोठावदे, निलिमा गायधनी, अश्विनी पगार, मनिषा कापसे, प्रशांत केंदळे यांनी विशेष प्रयत्न केले.

# खुंटेवाडी शाळेच्या पहिल्या दिवशी गावातून टाळ मृदुंगाच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत

**देवळा ।** आषाढी वारीसाठी पंढरपूरच्या दिशेने लाखो भाविक पायी दिंडीत चालत असून या भाविकांना बळ मिळावे हा आध्यात्मिक उद्धेश साधून तालुक्यातील खुंटेवाडी येथे जिल्हा परिषदेच्या शाळेच्या पहिल्या दिवशी गावातून टाळ मृदुंगाच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले.

जिल्हात सोमवारी दि १६ रोजी सर्वत्र शाळेच्या पहिल्या दिवशी विविध उपक्रम राबवून नवागतांचे स्वागत करण्यात आले. अशातच तालुक्यातील खुंटेवाडी येथे जिल्हा परिषदेच्या शाळेच्या पहिल्या दिवशी गावातून टाळ मृदुंगाच्या गजरात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. पुढील महिन्यात दि ६ रोजी



पंढरपूर येथेआषाढी एकादशी निमित्ताने यात्रा भरते. यासाठी संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांचे दर्शन घेण्यासाठी जिल्हाभरातील लाखो भाविक पंधरा वीस दिवस आधीच पायी दिंडीत सामील होतात. या वारकर्यांना बळ मिळाले हा प्रमुख उद्धेश डोळ्यासमोर ठेवून येथील माजी सरपंच व देवळा बाजार समितीचे संचालक भाऊसाहेब पगार यांच्या संकल्पनेतुन गावातून टाळ मृदुगाच्या गजरात दिंडी काढत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना गणवेश व पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले. या प्रसंगी सरपंच ठगुबाई पवार, उपसरपंच संजय भामरे, तंटामुक्ती अध्यक्ष सावळीराम भामरे, निंबा भामरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष योगेश भामरे, कैलास भामरे, सुरेश पगार, भिका भामरे, पांडुरंग भामरे, प्रभाकर रौद्ल, सेवानिवृत्त शिक्षक थोरात, सुभाष पगार, पोलीस पाटील कल्पना भामरे, मुख्याध्यापिका रत्नमाला गांगुर्डे, अर्चना काकडे, अंगणवाडी सेविका कल्पना भामरे, सुनंदा थोरात, गोसावी, देवरे आदी उपस्थित होते.

# पिंपळगाव बसवंत येथे वीस लाखांचे सोने लंपास

## शहरातील नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण

**पिंपळगाव बसवंत ।** येथील मोबाईल व्यावसायिक समीर ताराचंद सोनी यांच्या घरातील फर्निचर कामाच्या बहाण्याने आरोपी ताराराम घमांडाराम सुतार याने घरातील दागिन्यांच्या लॉकरची चावी मिळवून २० तोळे सोन्यावर डल्ला मारत फरार झाला आहे. आजच्या बाजारभावाप्रमाणे या सोन्याची किंमत २० लाखांच्या आसपास जात असल्याने पिंपळगाव बसवंत शहरामध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.



यााबाबत सविस्तर वृत्त असे की, समीर सोनी यांचे पिंपळगाव बसवंत शहरात मोबाईलचे दुकान आहे. पिंपळगाव बसवंत येथील जुन्या मार्केट यार्डाजवळ महावीरनगर येथे त्यांच्या सरतारा, निवासस्थानीघरातील फर्निचरचे काम सुरू होते. त्यामुळे आरोपी ताराराम सुतार, हल्ली मुक्काम प्रताप चौक, सिडको नाशिक (मुळ राहणार बालेसर, सत्ताजुडीया, जोधपूर, राजस्थान) हा सोनी यांच्या घरी फर्निचर बनविण्याच्या निमित्त त्याची घरात ये-जा सुरू होती. फेब्रुवारी २०२५ ते २३ मे २०२५ पर्यंत फर्निचरचे काम सुरू असल्याने सुतार हा सोनी यांच्या घरामध्ये वावरत होता. घरातील सदस्यांचा विश्वास संपादन करून आरोपीने शिताफीने लॉकरची चावी मिळवली होती. घरात कुणी नसल्याच्या संधीचा फायदा घेऊन आरोपीने चार तोळे वजनाचे मंगळसूत्र, दोन तोळे वजनाची चेन, दोन तोळे वजनाचे ब्रेसलेट, एक तोळा वजनाचे ब्रेसलेट, एक तोळा वजनाचे कानातील कर्णफुल, चारतोळे वजनाची अंगठी, तीन तोळे वजनाच्या बांगड्या, दीड तोळे वजनाचे मंगळसूत्र, सव्वा तोळे वजनाचे पॅडल असा एकूण २० तोळे सोन्याच्या ऐवजावर दरोडा टाकत आजच्या बाजारभावाप्रमाणे २० लाखांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना पिंपळगाव बसवंत शहरात घडल्याने पिंपळगाव बसवंत पोलीस प्रशासनासमोर मोठे आव्हान निर्माण झाले आहे. समीर सोनी यांनी पिंपळगाव बसवंत पोलीस ठाण्यात दरोड्याचा गुन्हा दाखल केला असून पोलीस पोलीस निरीक्षक दुर्गेश तिवारी यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मच्छिंद्र कोल्हे अधिक तपास करत आहेत. पिंपळगाव बसवंत शहरात चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. त्यामुळे नागरिकांनी किंमती वस्तू 'बाळगायच्या की नाही, असा प्रश्न निर्माण झाला आहे. पोलिसांचा धाक गुन्हेगारांवर राहिला नाही, अशी कुजबूज सुरू झाली आहे.

### पोलिसांचे नागरिकांना आवाहन

या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, फर्निचर कामगार, घरकाम करणारे, प्लंबर, इलेक्ट्रिशिअन अशा व्यक्तींची पार्श्वभूमी तपासूनच त्यांना काम द्यावे, असे पोलिसांनी आवाहन केले आहे.

# रेल्वे अंडरपासची मागणी पुन्हा ऐरणीवर

## शिवसेना शहरप्रमुख मयूर बोरसे यांच्यातर्फे स्मरणपत्र सादर

**मनमाड ।** शहरातील वाढती रहदारी आणि रेल्वे ओव्हर ब्रिजवरील ताण लक्षात घेता, भारत नगर येथे रेल्वे अंडरपास उभारण्याची मागणी पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. यासंदर्भात याआधी झालेल्या पत्रव्यवहाराची आठवण करून देणारे स्मरणपत्र शिवसेनेचे शहरप्रमुख मयूर बोरसे यांच्या वतीने आज संबंधित अधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

मनमाड हे भुसावळ रेल्वे विभागातील एक महत्त्वाचे जंक्शन असून, दररोज हजारोंच्या संख्येने प्रवासी रेल्वेने ये-जा करत असतात. शहराची लोकसंख्या सुमारे दीड लाखांच्या घरात असून, रेल्वे स्थानकाच्या दोन्ही बाजूंना घनदाट वसाहत आहे. या दोन्ही भागांना जोडणारा एकमेव रेल्वे ओव्हर ब्रिज इंडूर-पुणे राष्ट्रीय महामार्गावर असल्यामुळे, त्यावरून मोठ्या प्रमाणावर कंटेनर आणि ट्रकची वाहतूक होत असते. परिणामी, स्थानिक नागरिकांना विशेषतः विद्यार्थ्यांना, महिलांना आणि ज्येष्ठ नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. अधूनमधून अपघातांची मालिका सुरूच असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ही गरज ओळखून भारत नगरमधील रेल्वे फिल्टर हाऊसजवळ अंडरपास निर्माण करणे अत्यावश्यक ठरत असल्याचे मत शिवसेनेने व्यक्त केले आहे. या



मागणीसाठी आमदार सुहास कांदे यांनी ९ डिसेंबर २०२३ रोजी मध्य रेल्वेचे व्यवस्थापक, भुसावळ विभागीय रेल्वे प्रबंधक, वरिष्ठ मंडल अभियंता आणि सहाय्यक अभियंत्यांना पत्राद्वारे कल्पना दिली होती. मात्र अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कारवाई झाली नसल्यामुळे आज पुन्हा एकदा स्मरणपत्राद्वारे ही मागणी लावून धरली आहे.

या स्मरणपत्रात, वाढत्या रहदारीमुळे निर्माण झालेली धोकादायक परिस्थिती लक्षात घेऊन लवकरात लवकर योग्य तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त तळवाडे येथे वृक्षारोपण

**नाशिक ।** वनक्षेत्राचे प्रमाण राज्यात सर्वात कमी आहे. हे प्रमाण वाढवण्यासाठी यंदाच्या पावसाळ्यात आपापल्या परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडी विषयी आवड निर्माण व्हावी, असा आशावाद लाडशाखीय वाणी समाज सन्मित्र मंडळाचे अध्यक्ष निलेश मकर व संस्कारवाणी युवक मंडळाचे अध्यक्ष भुषण सोनजे यांनी व्यक्त केला.



वनक्षेत्राचे प्रमाण वाढले पाहिजे यासाठी यंदाच्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यासाठी लाडशाखीय वाणी समाज सन्मित्र मंडळ व संस्कार वाणी युवक मंडळातर्फे त्रंबकेश्वर येथील तळवाडे परिसरात विविध झाडांची लागवड करण्यात आली. या उपक्रमाचे समिती प्रमुख भुषण ब्राह्मणकर, अनिल सोनजे, पंकज कोठावदे, परेश येवले व उपस्थितांनी 'झाडे लावा झाडे जगवा' हा संदेश प्रत्येकाने आत्मसात करायला हवा असे सांगितले. यासाठी मोठया प्रमाणात पंचकृषीतून समाज बांधव यांनी सहभाग नोंदविला. सृष्टी देव यांना झाडांचे किती महत्व आहे, याविषयी कविता सादर केली. यावेळी राजेश कोठावदे, गिरीश महाजन, जितेंद्र येवले, मनोज शिनकर, शांताराम बधान, गणेश येवला, प्रशांत शिरूडे, सचिन बागड, धर्मेंद्र पाटकर, प्रसाद बागड, मयुर दशपुते, मंदार येवला, अमोल मुसळे, सागर कोठावदे हे उपस्थित होते.

# कर्जमाफीचा शेवट करा

(अशोक थोरात यांजकडून)

**लखमापूर ।** शेतमालाला रास्त भाव शासनाच्या हमीभावा प्रमाणे असचांना भाव दर कोसळले तर त्या प्रमाणात नुकसान भरपाई म्हणजे भावांतर योजना यांची काटेकोर अंमलबजावणी केली तर कर्ज माफी हा सततचा डोके दुखीचा विषय कायमचा संपणार आहे. तिजोरीचा अभ्यास न करता निवडणुका जिंकायचे हत्यार म्हणुन शेतकरी कर्ज माफी, सातबारा कोरा करू याची घोषणा सर्वच करतात व जो सत्तेवर बसतो त्याला खिंडीत पकडले जाते. कारण त्यांनी कर्जमाफी करू ही थाप निवडणुकीत मारलेली असते.

खरे तर कर्ज माफी विषय कधीच काढु नका, त्या पेक्षा शेतकऱ्यांना रास्त दर मिळेल अशी यंत्रणा उभारा. कांदा खरेदी बऱ्या व बोगस लुटारू कंपन्यांच्या नावाने अनेक वर्ष ठरावीक मंडळीने सत्ताधाऱ्यांना हाताशी धरून आर्थीक गडबडी करून लाखो नाही, कोटी कोटी रूपये कमवले. हे कमतांना शासनाला लुटले व शेतकऱ्यांना फसवले. आता बरे झाले यांची हकालपट्टी करून पारदर्शी पध्दतीने कांदा खरेदी होणार आहे. पण आता ही ठरावीक कलाकार थोडा तरी हात मारणारच. हे सर्व व शासनाच्या यंत्रणेतील लबाड लांडगे यांनी युती करून लुटले व लोकप्रतीनिधींनी डोळे लावले. म्हणजे डोळे लाऊन दुध पिण्याचे काम राजकीय भामट्यांनी केले. तत्कालीन मुख्यमंत्री ए.आर.अंतुलेंनी राज्यात पहीली कर्जमाफी केली व कर्जमाफीचे गाजर मिळत राहो या साठी कर्ज न भरणे सुरू झाले. शरद पवारांनी देशभरात ७२ हजार कोटी रू. कर्जमाफी केली व सर्वच बिघडले. या कर्ज माफीच्या फालतूपणामुळे सहकार चळवळ संपली. अनेक सहकारी बँका व सहकारी सोसायट्यांना घरघर लागली. उध्दव ठाकरे व एकनाथ शिंदेंनी पण कर्ज माफ केले व आता निवडणुकीत आश्वासने देणार व कर्जमाफी



होणारच अशी अवस्था झाली. आता सुध्दा भाजपा सह सर्वांनी कर्जमाफ करतो, असे जाहीर केले. पण अनेक अनावश्यक योजना ज्या निवडणुका जिंकण्यासाठी सुरू झाल्या त्यांना पैसा देणे अवघड झाले. विकास कामे थांबली ही मोठी शोकांतीका आहे. आता थकबाकीदारांच्या प्रगती अधोगतीच्या कुंडल्या काढा व खरच अडचणीत असलेल्यांना द्या कर्जमाफी पण शेवटची. ज्यांनी मोठे व्यवहार केले, निवडणुक लग्नात लाखो उडवले, नवीन संपती, जंगम स्थावर मालमत्ता घेतल्या अशांना कर्जमाफी करू नका हे बच्चु कडुंना पण सांगावेसे वाटते. जो खरच अडचणीत आहे त्याला करा मदत. दुसरी बाजु नियमीत कर्ज फेड करणाऱ्या प्रामाणिक शेतकऱ्यांना यंदा ३१ मार्च व ३० जुनला कर्ज भरले असेल, त्यांना भरलेले कर्ज परत करून बक्षीस द्या. म्हणजे भिक व बक्षीस याचा फरक मुद्दाम थकबाकीदार रहाणाऱ्यांना कळु द्या ही अपेक्षा आहे. आता भविष्यात थकबाकी दारासाठी बच्चू कडुंनी सरकारला वेठीस धरले तसे नियमीत भरणाऱ्यांचे पैसे परत करा या साठी कुणीतरी लोकप्रिय होण्यासाठी सरकारला वेठीस धरू शकतो. तेंव्हा कर्जमाफीला पोलीओ सारखे हद्दपार करून शेतकऱ्यांना पिकवलेल्या मालाला रास्त भाव द्या. शेतकऱ्यांना जे जे लागते ते जी.एस.टी.मुक्त करा व भावांतर योजना राबवा व कोणताच पक्ष कर्जमाफीचे गाजर दाखवणार नाही अशी तंबी निवडणुक आयोगाने द्यावी, हाच या आजारावरील चांगला उपचार ठरेल.

# मंदिरात दारू पिऊन, धूम्रपान, चप्पलसह प्रवेश करणाऱ्या मुस्लिम युवकास बेदम मारहाण

## धिंड काढत पोलिसांच्या ताब्यात

**सिडको ।** दारूच्या नशेत चप्पल घालून मंदिरात प्रवेश करत धूम्रपान करणाऱ्या मुस्लिम युवकाला संतप्त हिंदू युवकांनी चोप देत धिंड काढत थेट अंबड पोलीस स्टेशनला हजर केले. परिसरातील मंदिरात रविवारी रात्री घडलेल्या धक्कादायक घटनेने परिसरात तणाव निर्माण झाला आहे. सदर युवकाने स्वतःला 'निर्भीड महाराष्ट्र' या संघटनेचा पदाधिकारी असल्याचे सांगितले असून, त्याची ओळख आदिल शेख अशी झाली आहे. या प्रकारामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण होते. नागरिकांच्या तत्परतेने त्याला ताब्यात घेऊन पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले.

अंबड पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आदिल शेख याने मंदिरात प्रवेश



करतानाच धूम्रपान करत होता. त्यावेळी त्याने चप्पल न काढता थेट मंदिरात जाण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार पाहून उपस्थित हिंदू युवक भडकले आणि त्यांनी त्यास रोखत चोप दिला. या घटनेचा व्हिडीओ सोशल मीडियावर देखील मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला. सदर वार्ता वाऱ्यासारखी पसरताच राजकीय पदाधिकारी तसेच हिंदू बांधव मोठ्या संख्येने अंबड पोलीस ठाणे परिसरात उपस्थित होते. त्यांनी यावेळी पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांची भेट घेऊन सदर व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. घटनास्थळी पोलीस ठाण्यात गर्दी कमी करावी तसेच शांतता बाळगावी याकरिता पोलिसांनी आवाहन केले. तसेच या घटनेनंतर संभाव्य तणाव लक्षात घेता परिसरात पोलीस बंदोबस्त वाढवण्यात आला आहे. स्थानिक हिंदू संघटनांनी या घटनेचा तीव्र निषेध नोंदवला असून, आरोपीवर कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे. हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### ➤ महत्त्वाचे

## इंदिरानगर (जानोरी) शाळेत प्रवेशोत्सव साजरा

**नाशिक ।** इंदिरानगर (जानोरी) येथे शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात



आला. त्या अंतर्गत प्रभात फेरी, नवागतांचे स्वागत, पुस्तक वाटप, गणवेश वाटप करण्यात आले. जानोरी गावचे ग्रामपंचायत सरपंच सुभाष नेहेरे, ग्रामपंचायत अधिकारी नानाभाऊ खांडेकर यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष माया गावित, शिक्षणप्रेमी दत्तू वाघ, अस्वले बाबा, शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब कदम, शिवाजी देवरे, राजेंद्र बागुल, विलास मांडगे, नीलिमा घुमरे, काठे मॅडम , इंदिरानगर गावातील पालक वर्ग

# अरविंद विठ्ठल कुळकर्णी प्रखर हिंदुत्ववादी!

काही वेळेला असे घडते की, आपण एखाद्या आनंदाच्या कार्यक्रमाला गेलेलो असतो आणि आपल्याला एखादी दुःखद बातमी समजते. आजही तसेच घडले. एका जवळच्या नातेवाईकांच्या विवाह नोंदणीच्या कार्यक्रमाला गेलेलो होतो आणि अरविंद विठ्ठल कुलकर्णी गेल्याची बातमी समजली. बातमी समजल्यावर अरविंदराव यांचा नाशिकला केलेला सुमारे वीस वर्षांपूर्वीचा कार्यक्रम डोळ्यासमोर आला.

पूर्वी काही वर्ष धर्म भास्कर मासिक निघायचे, तेव्हा मी ते मासिक लावलेले होते. त्या मासिकाचा शेवटचा कालखंड होता. ते मासिक पक्के मिळावे याकरता ते माझ्याकडे पी अँड टी कॉलनीतले संघाचे स्वयंसेवक सरदेसाई घेऊन यायचे. ते मासिक घेण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे त्या मासिकाचे संपादक ज. द. जोगळेकर आणि अरविंद विठ्ठल कुळकर्णी यांचे राष्ट्रवादी आणि हिंदू विचारसरणीचे लेख. कुलकर्णी हे प्रखर हिंदुत्ववादी, सावरकरवादी विचारसरणीचे पाईक होते. नाशिकमधील तृतीय वर्ष शिक्षित प्रभाकर शिवराम तथा मामासाहेब जोगळेकर यांनी सेवाभावी समाज कल्याण संस्था सुरू केली होती. त्या संस्थेचे काम मी तेव्हाही करीत होतो. त्या संस्थेतर्फे दरवर्षी एका सामाजिक कार्यकर्त्याचा सत्कार केला जायचा आणि जातो. नाशिक मधील संघ स्वयंसेवक, त्यांच्या सामाजिक कामाकरता आणि ज्यांनी संघ बहुजन समाजापर्यंत पोहोचवला त्या बाळासाहेब अहिरे यांचा सत्कार करून त्यांना सेवा रत्न पुरस्कार द्यायचा असे ठरले.



बाळासाहेब यांनी नाशिक जिल्हा संघचालक म्हणूनही काम केले होते.

काही नावे पाहुणे आणि वक्ते म्हणून डोळ्यासमोर होती, त्यात अरविंद विठ्ठल कुळकर्णी यांचे होते. त्यांच्याशी संपर्क केला. त्यांनी कार्यक्रमाला येण्याकरता होकार दिला. पत्रिका छापताना काळजी घ्या असे ते म्हणाले. त्यांचे आडनाव कुळकर्णी आहे, तसेच छापावे कुलकर्णी नको. ठरल्याप्रमाणे ते कार्यक्रमाला आले. कार्यक्रम इंडियन मेडिकल असोसिएशनच्या हॉलमध्ये झाला. बाळासाहेब यांनी केलेल्या कामाची पोचपावती अरविंद विठ्ठल कुळकर्णी यांच्यामार्फत म्हणजे योग्य व्यक्तीच्या मार्फत दिली गेली. कार्यक्रमाच्या दुसऱ्या दिवशी घरी सकाळी भोजना करता आले होते. त्यामुळे त्यांच्या सहवासाचा लाभ देखील झाला होता. हा कार्यक्रम झाल्यानंतर एकदा काही दिवसांनी वसंत व्याख्यानमालेत देखील व्याख्यानाकरता ते आले होते, तेव्हा गंगेवर जाऊन त्यांची भेट घेतली होती. त्यावेळी अतिशय आस्थेने घरातील सर्वांची चौकशी केल्याचे मला आठवते आहे. कुळकर्णी यांनी पत्रकारितेची सुरुवात दैनिक मराठा मधून केली होती. साप्ताहिक विवेकचे संपादक म्हणूनही त्यांनी काही वर्षे काम केले होते. धर्म भास्कर आणि पुरुषार्थ मासिक यामधूनही त्यांनी भरपूर लिहिले. बाळासाहेब अहिरे यांच्या सत्काराच्या दिवशी देखील त्यांनी भाषण देखील त्यांच्या कामाप्रमाणे राष्ट्रवादी विचारांचेच केले. ठरवले होते तसा कार्यक्रम अतिशय छान पार पडला.

नंतरही धर्म भास्कर जोपर्यंत येत होता तोपर्यंत कुळकर्णी यांचे वाचत होतो. काळानुरूप अधोरेखित नावाचे युट्युब चॅनेल त्यांनी सुरू केले होते. त्यांचे लिखाण अतिशय निर्भिड आणि राष्ट्रवादी विचारांचे होते. काळाच्या ओघात धर्म भास्कर येणे बंद झाले. पण ज्यांच्या लिखाणाने मनामध्ये घर केले असे अरविंद विठ्ठल कुळकर्णी होते. आज एकीकडे विवाह नोंदणी चालू होती आणि दुसरीकडे माझ्या मनात या सगळ्या विचारांची गर्दी झाली होती. बराच काळ निघून गेला असला तरी काळाच्या पलीकडे जाऊन अरविंद विठ्ठल कुळकर्णी यांचे लिखाण कायम लक्षात राहील असेच होते. हिंदुत्ववादी विचारांचे सरकार आणण्यामध्ये ज्यांच्या लिखाणाने महत्त्वाची कामगिरी बजावली, कार्यकर्ते घडवले, पाया बांधला त्यात महत्त्वाची कामगिरी बजावणाऱ्यांमध्ये अरविंद विठ्ठल कुळकर्णी यांचे नाव कायम घेतले जाईल. त्यांना विनम्र भावपूर्ण श्रद्धांजली.

– **मिलिंद मधुकर चिंधडे**

# ‘माझी वसुंधरा’ योजनेत कोटींचा भ्रष्टाचार!

## त्र्यंबक नगर परिषद, ठेकेदारांच्या कारभारावर संशयाचं मळभ







**नाशिक ।** पर्यावरण संरक्षणाच्या नावाखाली त्र्यंबक नगर परिषदेकडून राबवण्यात आलेली ‘माझी वसुंधरा’ योजना सध्या वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. राज्य शासनाने या योजनेसाठी एक कोटी रुपयांचे बक्षीस त्र्यंबक नगर परिषदेच्या खात्यावर मंजूर केले होते. या निधीतून शहर व परिसरात झाडे लावण्याचा उपक्रम राबवण्यात आला, मात्र प्रत्यक्षात अनेक ठिकाणी झाडे सुकलेली, वाळलेली किंवा गायब असल्याचे स्पष्टपणे आढळून आले आहे. त्यामुळे हा निधी कसा वापरण्यात आला, कोणत्या निकषांवर खर्च झाला, आणि कामाचा दर्जा काय होता, यावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.



झाडे लावण्याचे कंत्राट ‘श्रीराज इंटरप्रायझेस’ या कंपनीला देण्यात आले असून, ऑगस्ट २०२३ मध्ये याबाबतचा कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. या ठेकेदाराने नेमकी किती झाडे लावली आणि कुठे लावली, याचे कोणतेही ठोस उत्तर अद्याप प्रशासनाकडे नाही. काही ठिकाणी झाडे लावल्याचे दाखवले असले तरी तिथे सुकलेली किंवा मृतावस्थेत झाडे दिसून येत आहेत. त्यामुळे कामाचे परीक्षण व देखरेख करण्यात गंभीर निष्काळजीपणा झाल्याचे स्पष्ट होते. या योजनेअंतर्गत झाडे लावणे ही ठेकेदाराची जबाबदारी होती. तर त्या झाडांना पाणी घालून जगवण्याची जबाबदारी नगरपालिका पार पाडणार होती, असे संबंधितांचे म्हणणे आहे. मात्र सध्या दोघेही एकमेकांवर जबाबदारी टाकत असल्याने आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. परिणामी, झाडांची दयनीय अवस्था आणि योजनेचा अपयश याची जबाबदारी नेमकी कोणाची, हा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्याच्या तयारीसंदर्भात त्र्यंबकमध्ये आलेल्या मंत्री गिरीश महाजन यांच्याकडे स्थानिक नागरिकांनी त्र्यंबक नगर परिषदेच्या कारभाराविरोधात तक्रारी केल्या. मुख्याधिकारी श्रीया देवचक्के यांच्या अकार्यक्षमतेबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्यानंतर महाजन यांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना चौकशीचे आदेश दिले. त्यानुसार उपविभागीय अधिकारी ओंकार पवार हे सध्या ‘माझी वसुंधरा’ योजना व इतर कामांची बारकाईने तपासणी करत आहेत. विशेषतः वसुंधरा योजनेतील कामांबाबत सर्वाधिक तक्रारी असून, त्याचा तपशीलवार आढावा घेतला जात आहे.

या प्रकरणात सामाजिक संस्था आणि पर्यावरणप्रेमींनी संताप व्यक्त करत ठेकेदार व मुख्याधिकारी यांच्याकडून संपूर्ण रकमेची वसुली करावी, अन्यथा मंत्रालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. झाडे लावून पर्यावरण संवर्धन करण्याऐवजी फक्त दाखवायची कामगिरी करून निधी गिळंकृत करण्यात आला आहे, असा गंभीर आरोप होत आहे. एकंदरीत, ‘माझी वसुंधरा’ या पर्यावरणपूरक उपक्रमाचा त्र्यंबक नगर परिषदेने बट्ट्याबोळ केला असून, यामध्ये लाखो नागरिकांच्या पैशांची उधळपट्टी झाली आहे. आता जबाबदारांवर कारवाई होणार की प्रकरण दाबले जाणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## कुंभमेळा प्राधिकरणाची पहिली बैठक संपन्न

# नियोजनात सर्व विभागांची महत्वाची भूमिका : डॉ. गेडाम




**नाशिक ।** सिंहस्थ कुंभमेळा आयोजनामध्ये सर्व विभागांची महत्वाची भूमिका आहे. संबंधित विभागांनी या सोहळ्याच्या अनुषंगाने केलेल्या नियोजनाला परिपूर्णता आणण्यासाठी त्यातील प्रस्तावामधील बाबी पुन्हा तपासाव्यात आणि ते अचूक होतील याकडे लक्ष द्यावे, अशी सूचना विभागीय आयुक्त तथा नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. प्रवीण गेडाम यांनी केली.

नाशिक व त्र्यंबकेश्वर तालुक्यांत व नाशिक विभागातील इतर क्षेत्रामध्ये होणाऱ्या कुंभमेळा व संलग्न उपक्रमांचे आयोजन व व्यवस्थापना साठी प्राधिकरण स्थापन करण्याबाबतचा अध्यादेश नुकताच जारी झाला. या प्राधिकरणाची पहिली बैठक आज विभागीय आयुक्त तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी जलज शर्मा, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, नाशिक महानगर विकास प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. माणिक गुरसळ, अहिल्यानगरचे जिल्हाधिकारी पंकज आशिया, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल, प्राधिकरणाच्या सह अध्यक्ष तथा मनपा उपायुक्त करिश्मा नायर, जिल्हा पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्यासह जलसंपदा, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सार्वजनिक आरोग्य , रेल्वे, सार्वजनिक बांधकाम, लेखा व कोषागारे, महावितरण आदी विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी गेडाम म्हणाले की, ही प्राधिकरणाची पहिलीच बैठक आहे. या अनुषंगाने सर्व विभागांची एकत्रित बैठक ही नियोजनाच्या दृष्टीने महत्वाची आहे. सर्व विभागाने या सोहळा कालावधीत करावयाच्या कामांचे नियोजन तयार केले आहे. त्यात अधिक अचूकता येण्यासाठी त्यातील महत्वाच्या बाबीवर आता अधिक व्यापक प्रमाणात लक्ष देणे आवश्यक आहे. बैठकीत कुंभमेळा अनुषंगाने करावयाच्या विविध कामाबाबत चर्चा झाली. त्यात आतापर्यंत प्रसिद्ध केलेल्या रुपये ४ हजार कोटींच्या निविदा लवकरात लवकर अंतिम करून कार्यारंभ देणे आणि रक्कम रुपये २ हजार कोटींच्या प्रगतीपथावर असणाऱ्या निविदा तत्परतेने निर्गमित करण्याचे निर्देश डॉ. गेडाम यांनी संबंधित यंत्रणेला दिले.

### कुंभमेळा प्राधिकरणासाठी लवकरच कार्यालय

कुंभमेळा प्राधिकरणासाठी कार्यालय सुरू करण्याबाबत आणि त्यासाठी जागेची निवड करण्याबाबत डॉ. गेडाम यांनी उपयुक्त करिश्मा नायर यांना सांगितले. मध्यवर्ती ठिकाणी असणारे, समन्वय आणि नियोजनासाठी सर्वांना सुलभ असेल अशी जागा निवडावी, असे त्यांनी सांगितले.

### कुंभमेळा कक्ष अधिक व्यापक होणार

सिंहस्थ कुंभमेळा नियोजनाच्या कामातील सुसूत्रतेसाठी यापूर्वीच कुंभमेळा कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. तो अधिक विस्तृत आणि व्यापक करून नियोजन आणि अंमलबजावणी, गुणवत्ता नियोजन आणि समन्वय या बाबीकडे अधिक लक्ष दिले जाणार असल्याचे यावेळी विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी सांगितले.

## आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्रेचे आयोजन





**नाशिक ।** ऐतिहासिक आणि अध्यात्मिक क्षण साजरा करतांना आर्ट ऑफ लिव्हिंग फाउंडेशनतर्फे सोमनाथ ज्योतिर्लिंग यात्राची घोषणा केली आहे. ही पवित्र यात्रा १५ जून ते ६ जुलै २०२५ दरम्यान महाराष्ट्रभर होणार आहे. रविवारी (१५ जून) सायंकाळी ५.३० ते ८.३० या वेळेत श्री कृष्ण लॉन, पुणे रोड, नाशिक येथे रुद्र पूजेसह मूळ सोमनाथ शिवलिंगाचे दर्शन झाले. या यात्रेद्वारे मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे अवशेष जनतेसमोर आणले जातील, जे भारताच्या संस्कृतीचा आणि अध्यात्मिक वारशाचा अमूल्य भाग आहेत. ही अवशेष त्या मूळ शिवलिंगाची आहेत, जी १०२६ ई.स. मध्ये महंमूद गजनीने नष्ट केली होती. सोमनाथ मंदिर, जे बारा ज्योतिर्लिंगांमध्ये पहिले आहे, आजही श्रद्धेचे प्रतीक म्हणून उभे आहे. १०२६ मध्ये घडलेला विध्वंस सर्वात भयंकर होता. लाखो भक्तांनी पूजलेले, आणि कधीकाळी जमिनीपासून तीन फूट वर तरंगत होते असे मानले जाणारे शिवलिंग त्याने उद्ध्वस्त केले. मात्र, मंदिराचे विध्वंस होऊनही भक्तांची श्रद्धा कायम राहिली. अग्निहोत्री ब्राह्मण कुळाने हे पवित्र अवशेष दक्षिण भारतात सुरक्षित ठेवले. स्वामी प्रणवानंद, स्वामी शिवानंद यांच्यासारख्या थोर संतांच्या हस्तांतरणा नंतर हे अवशेष तामिळनाडूमधील एका ब्राह्मण कुटुंबाकडे सुरक्षित ठेवण्यात आले. त्यांनी हे कांची शंकराचार्यांकडे नेले आणि जनतेसमोर आणण्याची परवानगी मागितली. शंकराचार्यांनी आशीर्वाद देत सांगितले, "आता वेळ आलेली आहे. हे अवशेष बेंगळुरूमधील गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्याकडे घेऊन जा. ते याला योग्य प्रकारे पुढे नेतील." आणि आज, गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली, हे पवित्र अवशेष सर्वांसाठी उपलब्ध होत आहेत.

## ओझरच्या औद्योगिक वसाहत परिसरातील रस्त्यांचे तीन तेरा





**ओझर ।** येथील सिद्धिविनायक औद्योगिक वसाहत परिसरातील प्रमुख रस्त्यासह बजरंग नगर येथील रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. वाहन धारकांना तारेवरची कसरत करत अत्यंत अवघड परिस्थितीतून जीवघेणा प्रवास करावा लागत आहे.

येथील रहिवासी,शाळकरी मुलांना मोठ्या अडचणीचा सामना करत प्रवास करावा लागत आहे. ओझर परिसरात मुख्य बाजारपेठ,शिवाजी नगर यांसह विविध उपनगरात रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.त्याच प्रमाणे मुख्यतः येथील तीन औद्योगिक वसाहतींना जोडणाऱ्या रस्त्यांचे तर अक्षरशः तीन तेरा वाजले आहेत. सिद्धिविनायक उद्योगिक वसाहतीसह जानोरी व जाऊळके औद्योगिक वसाहतींना जोडणारा हा एकमेव रस्ता आहे.येथील रस्त्यांवर मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. त्यातच सध्या संततधार पाऊस पडत असल्याने रस्त्यांचे अजूनच तीन तेरा वाजले आहेत.वाहन धारकांना तारेवरची कसरत करत प्रवास करावा लागत आहे.त्यातच औद्योगिक वसाहतीत आवडज वाहनांची रोजच वर्दळ असते.येथील स्थानिक रहिवासी,शाळकरी मुलांना देखील मोठ्या अडचणीचा सामना करत या रस्त्याने प्रवास करावा लागतो. पावसामुळे येथे सर्वत्र चिखलाचे साम्राज्य पसरलेले आहे. पायी चालणेही कठीण झाले आहे. ओझर नगर परिषदेस येथून मोठा कर जात असतांना येथे सुविधांचा नेहमीच अभाव दिसत आहे. ओझर नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी याची त्वरित दखल घ्यावी अन्यथा कर भरणे बंद करून आंदोलन छेडण्यात येईल अशी भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## ➤ महत्त्वाचे

### देवळा आयटीआयमध्ये प्रवेश प्रक्रिया सुरू

**देवळा ।** तालुक्यातील परमवीर चक्र मेजर शैतानसिंह शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (आयटीआय) रामेश्वर येथे सत्र २०२५-२६ साठी ऑनलाईन पद्धतीने १५ मे पासुन प्रवेश नोंदणी सुरु असुन संस्थेमध्ये कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट (कोपा), ड्रेस मेकिंग, जोडारी (फ़िटर), संधाता (वेल्डर), विजतंत्री (ईलेक्ट्रिशियन ), तारतंत्री (वायरमन), यांत्रिकी डिझेल (डिझेल मेकॅनिक), यांत्रिकी मोटरगाडी (मेकॅनिक मोटर व्हेहिकल) या विविध आठ व्यवसायासाठी 236 जागांकरीता प्रवेश प्रक्रिया सुरु झाली. अर्ज नोंदवुन झाल्यावर उमेदवारांनी नजिकच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत जाऊन आपला अर्ज निश्चित करावा व त्यानंतर विकल्प सादर करावे. प्रवेश प्रक्रियेच्या विविध टप्प्यावर औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये समुपदेशन करण्यात येत आहे. संस्थेत नुकत्याच झालेल्या भरती मेळाव्यात टाटा मोटर्स लि. पुणे यांनी ९० प्रशिक्षणार्थ्यांची तर बॉश लि. नाशिक यांनी ७० प्रशिक्षणार्थ्यांची तसेच व्हीआयपी टीडीके, महिंद्रा अशा नावाजलेल्या कंपन्यांनी ३७ प्रशिक्षणार्थ्यांची निवड केलेली आहे, अशी माहिती संस्थेचे गट निदेशक जी. सी. रणदिवे यांनी दिली. अर्ज करण्याची शेवटची मुदत २६ जून असुन ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज भरणे, माहिती पुस्तिका, वेळापत्रकासाठी https://admission.dvet.gov.in या संकेतस्थळाला अथवा संस्थेला भेट देण्याचे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस. डी. तिदमे यांनी केले आहे.

# विकसित भारत हे सर्वात प्रमुख ध्येय : आ. सीमाताई हिरे




**इंदिरानगर ।** विकसित भारत हे येत्या पाच वर्षातील सर्वात प्रमुख ध्येय असून ते गाठण्यासाठी जगाच्या बाजारपेठेत मागणी असणाऱ्या शैक्षणिक गुणा बरोबर वस्तूंच्या निर्मितीकडे प्राधान्याने लक्ष दिले पाहिजे. असे विकसित होत असलेला भारत देश आणि शिक्षणाची दिशा या विषयावर विद्यार्थ्यांना अध्यक्षीय मार्गदर्शन करताना आमदार सीमा हिरे यांनी प्रतिपादन केले.

इंदिरानगर, सराफ लॉन्स येथे आयोजित भाजपा मंडल गुरुगोविंद सिंग परिसर व पाथर्डी विभाग व प्रभाग क्रमांक 31 यांच्या वतीने जिद्द आणि मेहनतीच्या बळावर दहावी, बारावीच्या परीक्षेत उज्ज्वल यश मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पालकांचा विशेष गुण संपादन केल्याबद्दल विद्यार्थ्यांचा गुणगौरव तसेच प्रभागातील विविध ज्येष्ठ नागरिक संघ, हास्य क्लब व विविध क्षेत्रात विशेष गुण संपादन केलेल्याचा सन्मान चिन्ह आमदार हिरे याचे हस्ते देऊन सन्मानित देऊन आले. या प्रसंगी आमदार हिरे बोलत होते.

याप्रसंगी माजी नगरसेवक भगवान दोंदे, अॅड, श्याम बडोदे, माजी नगर सेविका पुष्पा आव्हाड, संजय नवले, बाळकृष्ण शिरसाठ, त्र्यंबक कोंबडे, सोनाली एकनाथ नवले, डॉ. पुष्पा पाटील आदी पदाधिकाऱ्यांसह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. त्यांचे स्वागत व सूत्रसंचालन मंडल अध्यक्ष जितेंद्र चोरडीया यांनी केले. आभार राम बडगुजर यांनी मानले. यावेळी नासर्डी ते पाथर्डी परिसरातील गुणवंत विद्यार्थी पालकांसह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वामी विवेकानंद विद्यालयात विद्यार्थी प्रवेशोत्सव उत्साहात



**पंचवटी ।** स्वामी विवेकानंद सोसायटी संचलित स्वामी विवेकानंद विद्यालयात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचा विद्यार्थी प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. प्रवेशोत्सवाच्या सुरुवातीस विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात, गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे व पालकांचे मान्यवरांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. शाळेच्या वातावरणात फुलांच्या माळा, रंगीत पताके, फुगे आणि फलकलेखन यामुळे आनंदमय उत्सवाचे चित्र अनुभवायला मिळाले. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे प्रतीकात्मक वितरण करण्यात आले. हे वितरण शालेय समितीचे अध्यक्ष निरेन सिंदेकर, मुख्याध्यापक किशोर झोटिंग आणि पर्यवेक्षिका शुभदा टकले यांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्याला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभाला मिळालेला हा उत्साही प्रतिसाद आणि वातावरण विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या आनंदाने अधिकच सुंदर झाला होता. विद्यालयाच्या वतीने सर्व नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले असून, उज्ज्वल शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

## ➤ महत्त्वाचे

### शांतीनगरमध्ये वृद्धाचा वॉकिंग दरम्यान मृत्यू

**सिडको ।** शहरातील जुना सिडको येथील शिवाजी चौक परिसरात राहणाऱ्या ८३ वर्षीय वृद्ध नागरिकाचा शांतीनगर गार्डनमध्ये वॉकिंग करताना अचानक चक्कर येऊन पडल्याने मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. १५ जून) सायंकाळी घडली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मयताचे नाव मधुकर रामभाऊ वडनेरे (वय ८३, रा. फ्लॅट नं. एन.९/पीजी २/२/३, शॉपिंग सेंटर, जुना सिडको, नाशिक) असे आहे. ते दररोजच्या प्रमाणे दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास आपल्या घराजवळील शांतीनगर गार्डनमध्ये चालण्यासाठी (वॉकिंग) गेले होते. यावेळी त्यांना अचानक चक्कर आली व ते जमिनीवर कोसळले. स्थानिक नागरिकांनी त्यांना बेशुद्ध अवस्थेत आढळून येताच तातडीने उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटलमध्ये हलवले. सायंकाळी ६ वाजता सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असता, वैद्यकीय अधिकारी डॉ. गावीत यांनी तपासून त्यांना मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच सिव्हील हॉस्पिटल पोलिस चौकीतील पोलीस अंमलदार पवार यांनी तपासाची नोंद घेतली असून, अंबड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### अंबड औद्योगिक वसाहतीत कामगाराचा चक्कर आल्याने मृत्यू

**सिडको ।** अंबड औद्योगिक वसाहतीत काम करणाऱ्या ३८ वर्षीय तरुण कामगाराचा कामाच्या ठिकाणी अचानक चक्कर येऊन पडल्याने मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. मृत कामगाराचे नाव राहुल मधुकर परदेशी असून ते इच्छामणी कॉलनी, सपना सिनेमा हॉलजवळ, जुना सिडको नाशिक येथे वास्तव्यास होते. ही दुर्दैवी घटना १५ जून रोजी दुपारी साधारणत १:१५ वाजता अंबड औद्योगिक वसाहतीतील अल्फ इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत घडली. काम करत असताना परदेशी यांना अचानक चक्कर आली आणि ते जमिनीवर कोसळले. त्यामुळे त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. घटनास्थळी उपस्थित असलेले कंपनीतील इतर सहकारी आणि एच. आर. अधिकारी भरत शांतीलाल शेलार यांनी तातडीने परदेशी यांना उपचारासाठी सिव्हील हॉस्पिटल, नाशिक येथे दाखल केले. सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यानंतर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून दुपारी ३:१० वाजता परदेशी यांना मृत घोषित केले. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला असून, सहकाऱ्यांमध्येही हळहळ व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच सरकारवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार पवार व सिव्हील हॉस्पिटल पोलिस चौकीचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. तपासाधिकारी मपोउनि उंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. सदर घटनेचा अंबड पोलीस स्टेशन येथे अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### नासाका विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव

**नाशिकरोड ।** पळसे येथील नासाका कार्यस्थळावरील माध्यमिक विद्यालयात शाळा प्रवेशोत्सव उपक्रम साजरा करून नव्याने प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत




करण्यात आले. नाशिक सर्व सेवाभावी ट्रस्टचे मानद व्यवस्थापक सुधाकर गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण पगार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमास ज्येष्ठ कामगार नेते प्रशांत कापसे, नानेगावच्या श्रीमंत श्री नर्सरीचे संचालक आणि कवी शरद आडके यांसह पालक, शिक्षक आणि कर्मचारी मंचावर उपस्थित होते. प्रारंभी विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात आले. गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला. तसेच गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. दहावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.

### महिला कर्मचाऱ्यासमोर लज्जास्पद वर्तन संशयिताला अटक

**मनमाड ।** शहरातील मनमाड नगरपालिका कार्यालयात कामकाज करत असतांना संशयित इसमाने दरवाज्यास लाथ मारून कार्यालयात येवून महिला कर्मचाऱ्यासमोर लज्जास्पद वर्तन करून अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करून बलात्कार करण्याची धमकी देवून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी शाहरूख शेख, रा. जामा मशिदीजवळ, टकार मोहल्ला, मनमाड याचेविरूध्द मनमाड पोलिसांनी विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला व त्याला अटक केली. मनमाड न्यायालयात त्याला उभे केले असता त्याला न्यायालयीन कस्टडी देण्यात आली. या प्रकरणी मनमाड नगरपालिकेतील महिला कर्मचाऱ्याने शहर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी तातडीने संशयित शाहरूख शेख याला अटक करून त्याच्यावर गुन्हा दाखल केला. पोलिस निरीक्षक विजय करे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक हेमंत भंगाळे तपास करीत आहे.

# गाडी पाडण्याच्या कारणावरून धारदार शस्त्राने हल्ला; तीन जण जखमी

## हल्लेखोराला पोलिसांनी घेतले ताब्यात

**मनमाड ।** शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या सरदार पटेल रोडवर उभी असलेली एक्टिवा गाडी दुसऱ्या मोटरसायकलने ठोस देऊन पाडण्याच्या वादातून एका तरुणाने धारदार शस्त्राने व्यापारी महासंघाच्या अध्यक्षासह त्यांचा भाऊ व पुतण्यावर हल्ला केल्याची घटना सोमवारी सायंकाळी चार वाजेच्या दरम्यान घडली. जखमींना मनमाड उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले असून या घटनेबाबत व्यापाऱ्यांसह नागरिकांनी असंतोष व्यक्त केला आहे.

सोमवारी सायंकाळी चार वाजेच्या सुमारास शहरातील सरदार पटेल रोडवर मोटरसायकल लावून अनिल पारिख हे कामानिमित्त कंदरकर यांच्या भांड्याच्या दुकानात गेले असता त्यांनी त्यांची दुचाकी दुकानासमोर लावली. रस्त्याने मोटरसायकलहून जाणाऱ्या एका युवकाने त्यांच्या दुचाकीला धक्का देऊन पाडली. गाडी पाडल्याचे लक्षात येताच अनिल यांनी सदरील तरुणाला याबाबत विचारले असता त्याने वाद घालण्यास सुरुवात केली आणि वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन या तरुणांनी चक्क धारदार शस्त्राने त्यांच्यावर हल्ला चढवला. वाद सोडवण्यासाठी आलेल्या त्यांचे बंधू आणि व्यापारी महासंघाचे अध्यक्ष राजेंद्र पारिक व त्यांचा पुतण्या द्वारकेश पारिक यांच्यावर देखील धारदार शस्त्राने या तरुण युवकाने हल्ला केला.






या हल्ल्यामध्ये राजेंद्र पारिक, अनिल पारिक, द्वारकेश पारिक हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर मनमाड उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेने नागरिक आणि व्यापारी वर्गातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. या घटनेनंतर उपजिल्हा रुग्णालयात शहरातील प्रतिष्ठित नागरिकांसह व्यापाऱ्यांनी एकच गर्दी उसळली. दरम्यान या घटनेनंतर पोलिसांनी शोध कार्य हाती घेऊन संशयित अल्ताफ शेख यास ताब्यात घेतले असून रात्री उशिरापर्यंत मनमाड पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.

# शक्तिप्रदर्शनाचीच रंगली चर्चा...



**दीपक भावसार यांजकडून**

**नाशिक ।** उबठामधून अर्धचंद्र दिल्यानंतर पुनर्वसनासाठी भाजपच्या तंबूत जाण्यासाठी नाना प्रयत्न करणाऱ्या सुधाकर बडगुजर यांना अखेर भाजपने पक्षात घेतले. नाशिक भाजपातीलच मंडळींकडून कडवा विरोध होऊनही अखेर भाजपच्या वरिष्ठ पातळीवरील मंडळींनी बडगुजर यांचा राजधानी मुंबईत पक्षप्रवेश घडवून आणला. तोही पक्षातीलच विरोधकांच्या नाकावर टिच्चून! पक्ष प्रवेशासाठी सिडकोतून जाताना बडगुजर यांनी प्रचंड शक्तिप्रदर्शन केले. सुमारे ५० बसेस, शे-दीडशे चारचाकींमधून समर्थकांना मुंबापुरीत नेले. त्यामुळे साऱ्यांचे लक्ष वेधले गेले असले तरी बडगुजर यांच्या भाजप पक्ष प्रवेशापेक्षाही खमंग चर्चा रंगल्या त्या शक्तिप्रदर्शनाच्या!

भाजप नेत्यांना सिडकोत आपली ताकद, सामर्थ्य दाखविण्याचा प्रयत्न बडगुजर यांनी शक्तिप्रदर्शनातून पक्ष प्रवेशासाठी जाताना केल्याची चर्चा कानावर पडली. भाजप पक्ष प्रवेशासाठी विरोध करणाऱ्यांना शह देण्याचाही हा भाग असल्याचाही चर्चेचा एक सूर होता; पण खरी चर्चा होती ती वेगळीच! सलीम कुत्तासह इतर प्रकारांमुळे बडगुजर यांच्याभोवती घोंगावणाऱ्या वादळाची तीव्रता कमी करण्यासाठी किंबहुना त्याची धार बोथट करण्यासाठी बडगुजर यांना सत्ताधारी पक्षाशिवाय पर्यायच नव्हता. शिंदे शिवसेना गटातून तीव्र विरोध असल्याने बडगुजर भाजपच्या वचळणीला गेले. तिथेही मोठ्या प्रमाणात विरोध झाला पण त्यांचा अखेर भाजपचा मार्ग मोकळा झाला. आता बडगुजर भाजपवासी झाल्याने सलीम कुत्तासह इतर सर्वच गोष्टी थंडावणार आहेत. त्यामुळे बडगुजर आता सर्वांगाने फक्त आणि फक्त भाजपचे ढोल बडवणार मंगळवारी (दि.१७) सकाळी भाजप पक्ष प्रवेशासाठी मुंबईला जाताना केलेले शक्तिप्रदर्शन हे त्याचेच द्योतक असल्याची मस्त चर्चा नागरिकांत रंगली होती.

# नितीन डोंगरे यांना महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचा 'बेस्ट फ्रेंड' पुरस्कार



**नाशिक ।** पुणे येथील महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनची नुकतीच वार्षिक सर्वसाधारण सभा पार पडली. यावेळी समाजातील वेगवेगळ्या स्तरावर विशेष कार्य करत असलेल्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचे अध्यक्ष व वरिष्ठ कर सल्लागार नितीन डोंगरे यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचा 'बेस्ट फ्रेंड अवॉर्ड' प्रदान करण्यात आला.

नितीन डोंगरे यांनी विविध संस्थांमध्ये कार्यरत असताना उल्लेखनीय कामकाज करीत त्यांच्या व्यक्तिमत्वाची छाप उमटवली असून विशेष करून कर सल्लागार असोसिएशनच्या विविध स्तरावरील सेमिनार, कॉन्फरन्स, यासाठी त्यांनी अतुलनीय कार्य केलेले आहे. हे कार्य करताना त्यांनी प्रत्येक व्यक्तीशी नाळ जोडत अनेकांना सेवा देत, ते कायमच मार्गदर्शन करत आहेत. कर सल्लागारांना दैनंदिन कामकाजात येणाऱ्या अडीअडचणी बाबत कायम तत्पर राहत मैत्रीपूर्व नात्याने त्यांना मार्गदर्शन करत त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी मदत करतात. सर्वांशी मैत्रीपूर्व जिव्हाळ्याचे संबंध निर्माण करत असतात यामुळे खऱ्या अर्थाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला शोभेल असा 'बेस्ट फ्रेंड ॲवार्ड'' अर्थाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनुरूप असल्याचे मत एमटीपीए अध्यक्ष प्रसाद देशपांडे यांनी व्यक्त केले. यावेळी नाशिक येथील कर सल्लागार आणि चव्हाण यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना "कोहिनूर" पुरस्काराने तर सिन्नर येथील नयन निऱ्हाळी यांना "सुपरस्टार' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

### हा तर टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचा गौरव

पुरस्काराने कार्य करणाऱ्या व्यक्तीवरील जबाबदारी अधिक प्रमाणात वाढते व अधिक उत्तम कार्य करण्यासाठी उत्तेजित करत असते. यामुळे कोणत्याही पुरस्कारामुळे निश्चितच उत्साह वाढून प्रेरणा मिळत असते. हा पुरस्कार केवळ व्यक्तिगत माझा नसून तर उत्तर महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या नॉर्थ महाराष्ट्र टॅक्स प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचा गौरव आहे व मी सर्व सहकारी मित्र सदस्य यांना तो समर्पित करतो. – **नितीन डोंगरे**

# ई.व्ही.एम. मशीन विरोधात बसपाचे धरणे आंदोलन

**मनमाड ।** देशातील यापुढे होणाऱ्या सर्व निवडणूका ई. व्ही. एम.च्या ऐवजी बॅलेट पेपरवर घेण्यात यावे या मागणीसाठी बहुजन समाज पार्टि मनमाड शहर युनिट तर्फे शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या शेजारी एक दिवशी धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी "ई. व्ही.एम हटाव, देश बचाव" अशा जोरदार घोषणाबाजी करण्यात आले.




आपला भारत देश हा जगातील सर्वात मोठा लोकशाही प्रधान देश आहे. लोकशाही मध्ये होणाऱ्या निवडणुका या संपूर्णपणे पारदर्शक आणि सर्वसामान्य नागरीकांना विश्वासपात्र होणे गरजेचे आहे. त्यासाठी ईव्हीएम च्या ऐवजी या सर्व निवडणुका पुर्वी प्रमाणे बॅलेट पेपरवरती घेणे गरजेचे आहे. कारण मागील सन २०१४-२०१९-२०२४ या वर्षामध्ये ज्या निवडणुका झालेल्या आहेत. त्यामध्ये अनेक राज्यात या ईव्हीएम विषयी घोटाळे झालेले आहेत. त्यामध्ये पंजाब, हरयाणा, महाराष्ट्र, बिहार इत्यादी राज्यातील निवडणुकांवर तेथील जनतेने प्रश्नचिन्ह निर्माण केलेले आहे आणि अनेक संघटना कोर्टात गेलेल्या आहेत. सुप्रिम कोर्टातील एक जेष्ठ वकील ॲड. महेमूद प्राचा हे आणि त्यांचे सहकारी गेल्या अनेक वर्षापासून या ईव्हीएमच्या विरोधात संघर्ष करीत आहेत. दिल्ली येथे जंतरमंतर वर या ईव्हीएमच्या विरोधात आणि यापुढील सर्व निवडणूका बॅलेट पेपरवरच घेतल्या पाहिजेत.यासाठी आंदोलन करण्यात येणार आहे. सदर आंदोलनास आम्ही मनमाड येथे पाठींबा व्यक्त करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाजवळ एक दिवसीय धरणे आंदोलने करीत आहोत.तरी देशातील सर्वसामान्य जनतेच्या भावना लक्षात घेऊन यापुढे देशात होणाऱ्या सर्व निवडणुका या ईव्हीएमला बॅन करुन बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. या एक दिवसीय धरणे आंदोलनात एस.एम भाले,प्रवीण पगारे, बाळासाहेब आहिरे, पांडू पगारे, सागर त्रिभुवण, महेंद्र कलवर, रामदास पवार, गौरव आहिरे, भास्कर संसारे, गौरव आहिरे, अनिल सोनवणे, इकबाल पठाण, संतोष गायकवाड आदिंनी निवेदनावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत.

# भाजपा उत्तर नाशिक जिल्हा कार्यशाळा पिंपळगाव बसवंत येथे संपन्न

**पिंपळगाव बसवंत ।** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील यशस्वी ११ वर्षांचा प्रवास जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी भाजपा उत्तर नाशिक जिल्हा कार्यशाळा पिंपळगाव बसवंत येथे संपन्न झाली.



या कार्यशाळेमध्ये आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आणि पक्षाची संघटनात्मक बांधणी या दृष्टीने मार्गदर्शन झाले. ही कार्यशाळा म्हणजे संघटनात्मक बळकटीसाठी उचललेलं एक महत्त्वाचं पाऊल आणि विजयाचे संकल्पस्थान असल्याची भावना मान्यवरांनी व्यक्त केली. कार्यशाळा बैठक भाजपाचे जिल्हाध्यक्ष यतिन कदम यांच्या मार्गदर्शनाने व भागवत बाबा बोरस्ते यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकीला उपस्थित युवा नेते सतीश मोरे, वैकुंठ पाटील, बापूसाहेब पाटील, लक्ष्मण निकम, सुनील पवार, मंडळ अध्यक्ष मयुर गावडे, विष्णू ढोमसे, मदन घुमरे, दिगंबर लोहिते यांनी मनोगत व्यक्त केले. पिंपळगाव शहर अध्यक्ष प्रवीण मोरे यांनी आभार मानले. यावेळी समीर देवकर यांच्यासह अशोक घुटे, सुरेंद्र ढोमसे, सुरेश जाधव,कृष्णा महाले, योगेश अहिरे आदींनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास अल्पेश पारख, हेमंत बोरस्ते, सुनील घेगडे, गोविंद कुशारे, सुहास शिंदे, अरबाज पठाण, सुनील मोरे, अभय बलदोटा, राहुल विधाते, चिंधु काळे, प्रशांत घोडके, संदीप झुटे, राहुल सोनवणे, रमेश आहेर, जगदीश कुशारे, निशाताई जाधव, प्रतिभा मोरे, कुसुमताई निळकंठ,अंजूताई चव्हाण, चेतन मोरे, निलेश शेळके, स्वप्निल लोढा, आकाश साळूंखे, भारत सूर्यवंशी, सचिन हिरे, अक्षय जोशी, गणेश ढोमसे, गणपत ढोमसे, अतुल चव्हाण, भूषण मोरे, स्वामी बोरस्ते तालुक्यातील आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते.

# कृउबाच्या कर्मचाऱ्यांचे काम बंद आंदोलन

## तहसीलदार, सहाय्यक निबंधकाच्या समाधानकारक उत्तर दिल्यानंतर आंदोलन तूर्त मागे

**मनमाड ।** मनमाड कृषी उत्पन्न बाजार समिती मधील तीन कर्मचाऱ्यांचे बेकायदेशीर केलेले निलंबन तात्काळ रद्द करावे आणि कर्मचाऱ्यांचे थकलेले तीन महिन्याचे वेतन तात्काळ अदा करावे या प्रमुख मागण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आज सोमवारपासून बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले. सर्व कर्मचारी बाजार समितीच्या प्रवेशद्वाराजवळ भरपावसात धरणे आंदोलन केले. दरम्यान यावेळी तहसिलदार सुनिल सौदणे व सहाय्यक निबंधक अर्चना सौदाणे, बाजार समिती संचालक मंडळ यांनी यावेळी दिनांक २३/०६/२०२५ रोजी बाजार समितीच्या संचालक मंडळाची सभा आयोजित करण्यात आली असून त्या सभेमध्ये निलंबन मागे



घेण्यात येईल आणि सह्यांचे अधिकार देऊन पगार केले जाणार असल्याचे आंदोलनकर्त्यांना समाधानकारक उत्तर दिल्यानंतर आंदोलन तूर्त मागे घेण्यात आले.

मनमाड बाजार समितीत सध्या काही महिन्यांपासून सत्तातंर नाट्य सुरू असल्याने याचा फटका कर्मचाऱ्यांसह शेतकरी वर्गाला बसत आहे. या काम बंद आंदोलनामुळे आठवड्याच्या पहिल्या दिवशीच मनमाड कृषी उत्पन्न बाजार समितीमधील शेतमाल लिलावाचे कामकाज ठप्प होऊन शेतकऱ्यांची मोठी गैरसोय झाली. या संदर्भात बाजार समितीमधील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पण संचालक विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती सर्व संचालक आणि पोलीस निरीक्षक आदींना निवेदन दिले. बाजार समितीचे सभापती दीपक गोगड हे अधिकाराचा गैरवापर करून कर्मचारी



वर्गावर अन्याय करून त्यांना त्रास देत आहेत. तसेच बाजार समितीकडे निधी असताना देखील हेतू पुरस्कार कामगारांचे तीन महिन्याचे पगार केलेले नाही. या त्रासाला कंटाळून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी आजपासून काम बंद आंदोलनाचा निर्णय घेतला. या निवेदनावर बाजार समितीमधील सर्व अधिकारी आणि कर्मचारी अशा २९ जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान आठवड्याच्या पहिल्याच दिवशी बाजार समितीमध्ये कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारल्यामुळे मार्केटमध्ये कांदासह धान्य व इतर शेतमाल लिलावाचे कामकाज ठप्प झाले. एरवी गजबजलेल्या कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आज शुकशुकाट दिसून आला. बाजार समितीचे प्रभारी सचिव गायकवाड प्रभारी लेखापाल व्ही. के. घुगे, सुपरवायझर एम. जी. बाविस्कर, निरीक्षक डी. डी. पवार, एस. सी. पवार, एच, डी. पोटिंदे, आर. ए. आहेर, एस. एस. उगले, के. एम. आव्हाड, श्रीमती बी. पी. घुगे आदींसह अधिकारी, कर्मचारी या बेमुदत काम बंद आंदोलनात सहभागी झाले होते.

